# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/पदवी/२०२४–२५/०९
दिनांक – ०२ जुलै, २०२४

परिपत्रक

विषय :– मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षणशुल्क, परिक्षा शुल्क देण्याच्या योजनेअंतर्गत आकारावयचे शुल्क.

संदर्भ :– १) विद्यापीठ परिपत्रक क्र.CONCOL/FEE/194of 2008, दि.२३ मे, २००८.
२) विद्यापीठ परिपत्रक क्र.CONCOL/FEE/292 of 2008, दि.७ जूलै,२००८.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि (२४)२९६/२००८ दि.७ जूलै,२००८.
४) विद्यापीठपरिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि (२४)२३२/२००९ दि. १८ जून,२००९.
५) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि/पदवी/५३/२०१३दि. ३० मे, २०१२.
६) विद्यापीठ परिपत्रक क्र.वि.क/भा.स.शि/पदवी/२/२०१३ दि. ७ जून, २०१३.
७) शासन परिपत्रक क्र.शिवृत्ती–२०१८/प्र.क्र.२४२/शिक्षण दि. १४ मार्च, २०१९.
८) शासन निर्णय क्र.अजाशि–२०१९/प्र.क्र.३४५/शिक्षण–१, दि.१५जानेवारी,२०२०

प्राचार्य/संचालक, सर्व अनुदानित/विनाअनुदानित (अल्पसंख्यांक महाविद्यालयासह) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये/ संस्था तसेच संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या संदर्भाधीन परिपत्रकानुसार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विविध पदवीपुर्व अभ्यासक्रमांसाठी सुधारित शुल्क रचना २००८–२००९ या शैक्षणिक वर्षापासुन लागू केलेली आहे व तसे या कक्षानी वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत.

तथापि, विद्यापीठाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, संदर्भिय परिपत्रक क्र. ६ मध्ये नमुद केलेल्या शिर्षकापेक्षा अतिरीक्त शुल्क मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आले असल्याच्या तक्रारी या कक्षास प्राप्त होत आहेत, तेव्हा या परिपत्रकानुसार संबंधिताना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठाने परिपत्रक क्र.CONCOL/FEE/194 of 2008, दिनांक २३ मे, २००८ व परिपत्रक क्र. CONCOL/FEE/292 of 2008, दिनांक ७ जूलै, २००८, नुसार सर्व अनुदानित/विनाअनुदानित/अल्पसंख्यांक महाविद्यालयात पदवीपुर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशावेळी शुल्क रचना निश्चित केलेली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिक्षणशुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्क जे महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण व आदिवासी विकास विभागामार्फत विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्काची प्रतिपुर्ती महाविद्यालयांना केली जाते. सदर शुल्क. वगळून मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून पदवीपुर्व अभ्यासक्रमात प्रवेश घेते वेळी फक्त :– १) ॲडमिशन प्रोसेसिंग फी, २) डॉक्युमेंन्ट व्हेरीफीकेशन फी (लागू असल्यास), ३) डिझास्टर रिलिफ फंड, ४) ग्रुप इन्शूरंन्स फी, ५) स्टुडंट वेलफेअर फंड, ६) ई सुविधा, ७) अल्यूमनी असोसिएशन फी व ८) व्हाईस चान्सलर फंड या शिर्षकाचे शुल्क आकारण्यात यावेत व याव्यतीरीक्त इतर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येवू नयेत.

दिनांक : ०२ जूलै, २०२४
स्थळ : मुंबई ४०० ०३२

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

२/–

Scanned with OKEN Scanner

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध विभाग व संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था.
२. प्राचार्य/संचालक, अशासकीय (अनुदानित व विनाअनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये (अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक महाविद्यालये)

प्रत माहितीसाठी

१. वित्त व लेखा अधिकारी.
२. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव / सह कुलसचिव
३. परिक्षा नियंत्रक, महात्मा फुले भवन.
४. अभिलेखा विभाग (१०प्रति).
५. अध्यक्ष, मुंबई विद्यापीठ कमचारी संघ, फोर्ट, मुंबई .४०००३२.
६. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी, संघटना, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई .४०००९८.
७. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, बी रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२०.
८. अध्यक्ष, महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टिचर्स असोसिएशन, अ—१/२४ अनुपम नगी, मुरबाड रोड कल्याण, जिल्हा ठाणे.
९. सचिव, बॉम्बे युनिर्व्हसिटी अकॅडमिक स्टाफ असोसिएशन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई .४०००९८.

Baliram

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव